Title of Programme: **तृतीय वर्ष मराठी अभ्यासक्रम एकदिवसीय कार्यशाळा**

Name of Organizing Department : **मराठी विभाग**

Name of the Coordinator of the Programme: **डॉ. संजय शिंदे**

Date of the Programme : ४/७/२०२६

Venue: **हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर**

Target Group : **सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील मराठी विषयाचे प्राध्यापक**

Number of Participants: ११०

Name of Resource Person : **डॉ. सुधाकर शेलार, डॉ. प्रमोद आंबेकर, डॉ. सुरेश जाधव आणि डॉ. प्रकाश शेवाळे**

Total Expenditure for the Programme: - ३३२४०/-

Source of Funding: - **सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे**

**Report: तृतीय वर्ष मराठी अभ्यासक्रम एकदिवसीय कार्यशाळा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे हुतात्मा राजगुरू महाविद्यालय येथे दिनांक ४ जुलै २०२६ रोजी तृतीय वर्ष मराठी विषयाच्या अभ्यासक्रमाची एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्ह्यांतील मराठी विषयाच्या ११० प्राध्यापकांनी या कार्यशाळेत सहभाग नोंदविला.

कार्यशाळेचे उद्घाटन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मानव्यविद्या शाखेचे अधिष्ठाता डॉ. प्रभाकर देसाई यांच्या हस्ते झाले. उद्घाटनपर मार्गदर्शनात त्यांनी नवीन शैक्षणिक धोरणाच्या पार्श्वभूमीवर अभ्यासक्रमाचे स्वरूप अधिक लवचिक व सर्वव्यापक झाले असल्याचे नमूद केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मराठी अभ्यास मंडळाने अभ्यासक्रम तयार करताना आवश्यक ते स्थानिकीकरण करावे तसेच ज्ञान, कौशल्य व कृतीधारित अध्ययनाला प्राधान्य द्यावे, असे त्यांनी प्रतिपादन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील होते. याप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. संदीप सांगळे, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. शिल्पा जगताप, डॉ. पायल ओसवाल आणि उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे उपस्थित होते.

मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. संदीप सांगळे यांनी तृतीय वर्ष मराठी विषयाचा अभ्यासक्रम रोजगाराभिमुख व व्यावहारिक स्वरूपाचा असून त्यामध्ये साहित्य व भाषेची सांगड घालण्यात आल्याचे स्पष्ट केले. अभ्यासक्रमातील घटकांवर प्राध्यापकांनी सविस्तर चर्चा करून त्यांच्या सूचना व अभिप्रायांच्या आधारे अभ्यासक्रम अंतिम करावा, असे त्यांनी आवाहन केले.

अध्यक्षीय मनोगतात संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी बदलत्या समकालीन गरजांचा विचार करून विद्यार्थ्यांना सर्वार्थाने सक्षम करणारा आणि त्यांच्या भविष्यातील संधींना पूरक ठरणारा अभ्यासक्रम विकसित करण्याची

HRM

अपेक्षा व्यक्त केली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील मराठी विषयाच्या सर्व प्राध्यापकांचे स्वागत केले.

कार्यशाळेतील विविध सत्रांमध्ये मराठी अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. सुधाकर शेलार, डॉ. प्रमोद आंबेकर, डॉ. सुरेश जाधव आणि डॉ. प्रकाश शेवाळे यांनी नवीन शैक्षणिक धोरणानुसार तृतीय वर्ष मराठी विषयाच्या अभ्यासक्रमाची रचना, अध्यापन पद्धती, मूल्यमापन प्रक्रियेतील बदल तसेच श्रेयांक पद्धती याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. या अनुषंगाने प्राध्यापकांनी अभ्यासक्रमाच्या विविध घटकांवर चर्चा करून आपली मते व सूचना मांडल्या.

कार्यशाळेचे प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख डॉ. संजय शिंदे यांनी केले, तर सूत्रसंचालन डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी केले. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील मराठी विषयाच्या प्राध्यापकांचा व्यापक सहभाग आणि अभ्यासक्रमाच्या विविध अंगांवर झालेली सखोल चर्चा यामुळे कार्यशाळा शैक्षणिकदृष्ट्या उपयुक्त व फलदायी ठरली.

डॉ. संजय शिंदे
मराठी विभाग प्रमुख
हुतात्मा राजगुरु महाविद्यालय
राजगुरुनगर,ता.खेड,जि.पुणे.

डॉ. शिरीष पिंगळे
प्राचार्य
हुतात्मा राजगुरु महाविद्यालय
राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे.






मानव्य विद्या शाखा अधिष्ठाता डॉ. प्रभाकर देसाई यांचे यांचे स्वागत करताना संस्था पदाधिकारी




मानव्य विद्या शाखा अधिष्ठाता डॉ. प्रभाकर देसाई मनोगत व्यक्त करताना

पुण्य नगरी

# ज्ञान, कौशल्य व कृतीधारित अभ्यासक्रम असावा : डॉ. देसाई

**राजगुरुनगर : प्रतिनिधी**

नवीन शैक्षणिक धोरणामध्ये अभ्यासक्रमाचे स्वरूप लवचिक व सर्वव्यापक झाले आहे. या पार्श्वभूमीवर मराठी अभ्यास मंडळाने नेमकेपणाने अभ्यासक्रम तयार करताना काही प्रमाणात स्थानिकीकरण करावे आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी ज्ञान, कौशल्य व कृतीधारित अभ्यासक्रम तयार करावा, असे आवाहन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील मानव्यविद्या शाखेचे अधिष्ठाता डॉ. प्रभाकर देसाई यांनी केले.



ते खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे हुतात्मा राजगुरू महाविद्यालय आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत आयोजित तृतीय वर्ष अभ्यासक्रम एकदिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील होते. या प्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. संदीप सांगळे, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. शिल्पा जगताप, डॉ. पायल ओसवाल, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे उपस्थित होते.

अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. संदीप सांगळे यांनी तृतीय वर्ष मराठी विषयाचा अभ्यासक्रम रोजगाराभिमुख, व्यावहारिक, साहित्य, भाषा यांची सांगड घालून तयार केला असून प्राध्यापकांना सविस्तर चर्चा करून अभ्यासक्रम अंतिम करण्याचे आवाहन केले.

संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी बदलत्या समकालीन गरजांची पूर्ती करणारा अभ्यासक्रम तयार करून विद्यार्थ्यांना सर्वार्थाने सक्षम करावे असे मराठी अभ्यास मंडळाला आवाहन केले.

प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील मराठी विषयाच्या सर्व प्राध्यापकांचे स्वागत केले.

Pimpri Chinchwad Edition
Jul 06, 2026 Page No. 02
Powered by: erelego.com